**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **'बाप्पा कट्टा' या चर्चासत्राचे पहिले पुष्प संपन्न**
- **शाडू माती मूर्तीचे पर्यावरण तज्ज्ञांकडून आवाहन**

**मिरा-भाईंदर, २७ फेब्रुवारी २०२५:** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि निसर्गाचा ऱ्हास थांबवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने 'बाप्पा माझा शाडूचा' हा उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत गुरुवारी बाप्पा कट्टा हा कार्यक्रम पालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आला होता. नामवंत पर्यावरण तज्ज्ञ रोहित जोशी यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मिरा भाईंदर महापालिका अनेक उपक्रम राबवत असते. या वर्षापासून मिरा भाईंदर महापालिकेच्या नाविन्यता कक्षाच्या माध्यमातून 'बाप्पा माझा शाडूचा' हा अभिनव उपक्रम चालू करण्या करण्यात आला आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसला आळा घालून शहरातील प्रत्येक मूर्तिकारापासून नागरिकांपर्यंत शाडूच्या मातीचा वापर करावा यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. त्यासाठी 'बाप्पा माझा शाडूचा' हा उपक्रम राबविण्यात आला आहे. गुरूवारी २७ फेब्रुवारी २०२५ रोजी महानगरपालिकेच्या मुख्यालयातील स्थायी सभागृहात बाप्पा कट्टा या कार्यक्रमाचं आयोजन केले होते.

प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर करून गणेश मूर्ती घडवल्या तर जलप्रदूषण, नैसर्गिक संसाधनाची हानी आणि पर्यावरणाचा असमतोल होण्याचा धोका वर्तवला. याशिवाय शहरातील कांदळवन, जलचर प्राणी तसेच एकूणच पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असल्याचे सांगितले. त्यामुळे आपण प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) वापर न करता शाडूच्या मातीचा किंवा इतर नैसर्गीक मातीचा वापर करून गणेश मूर्ती घडवाव्यात असे आवाहन केले. यावेळी त्यांनी पीओपी मूर्तीचे विघटन होण्यास लागणारा काळ आणि त्याचा एकंदरीत परिणाम यावर विशेष प्रकाश टाकला. या चर्चासत्रात त्यांनी उपस्थित मूर्तिकारांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांना बाप्पा कट्टा कार्यक्रमात पर्यावरण तज्ज्ञ जोशी यांनी समाधानपूर्वक उत्तर देऊन त्यांच्या मनातील संभ्रम दूर केले.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, सहाय्यक आयुक्त कांचन गायकवाड, सहाय्यक आयुक्त सुधाकर लेंडवे, सहाय्यक आयुक्त दत्तात्रेय वरकुटे, सहाय्यक आयुक्त लॉरेटा घाडगे तसेच सर्व पर्यावरणप्रेमी, मूर्तिकार, समाजसेवक आदी उपस्थित होते.